# गोष्टी ईश्वराच्या - २

## लेखक : विष्णू नागर



एके दिवशी ईश्वर अचानक एका मजुराच्या घरी पोचले. घरी आलेले अतिथी समजून त्याने त्यांची चांगली सरबराई केली.

ईश्वर त्याच्यावर प्रसन्न झाले आणि गुपचूप सतरंजीखाली काही सोन्याच्या मोहरा ठेवून आले.

नंतर जेव्हा मजुराच्या पत्नीने सतरंजीची घडी घातली, त्यातून मोहरा बाहेर आल्या. तिने आपल्या पतीला सांगितलं. झालं. मजूर ईश्वराला शोधायला निघाला. जिथे जिथे तो असण्याची शक्यता होती, तिथे तिथे तो गेला. त्याला काय ठाऊक की हे प्रत्यक्ष ***ईश्वर*** होते.

थकून भागून त्याने सोन्याच्या मोहरा पोलिसचौकीत जमा केल्या आणि त्या बदल्यात पोलिसांचा मार खाऊन आला.

ईश्वराला जेव्हा मजुराच्या या मूर्खपणाबद्दल कळले, तेव्हा ते खूप रागावले.

त्यांनी दुसऱ्याच दिवशी त्याला नोकरीतून कमी केल्याची नोटीस पाठवून दिली.

*हिंदी शैक्षणिक संदर्भ अंक १६३ मधून साभार.*

*§§§*

---

लेखक : **विष्णू नागर,** पत्रकार, नवभारत टाईम्स, दैनिक हिंदुस्तान, कादंबिनी, नई दुनिया आणि शुक्रवार समाचार साप्ताहिक यांच्याबरोबर काम केले आहे. भारतीय प्रेस परिषदेचे माजी सदस्य आणि वर्धा येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय विश्वविद्यालयाच्या कार्यकारिणीचे माजी सदस्य. सध्या स्वतंत्र लेखन करतात.

अनुवाद : **संजीवनी आफळे**, शैक्षणिक संदर्भ गटात सहभागी.

इ-मेल : saaphale@rediffmail.com

*ही कथा हरियाणा राज्य संसाधन केंद्राने तयार केलेल्या विष्णू नागर यांच्या 'ईश्वर की कहानिया' या पुस्तकातून साभार.*

***(कळीचे शब्द : कथा, story)***